CR 2005122213

(384)

19

क्रमांक/सिटीएस/सीआर १३३९ /ना.भू-१/०५
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे यांचे कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत, २ रा मजला,
विधान भवनासमोर, पुणे -४११ ००१.
दिनांक :- १९/१२/२००५.

22 DEC 2005

**विषय:- नगर भूमापन क्षेत्रातील गांव नमुना नं. २ आद्यावत करणेबाबत.**

**परिपत्रक**

राज्यातील नगर भूमापन झालेल्या क्षेत्रातील गांव नमुना नं. २ आद्यावत ठेवणेची जबाबदारी नगर भूमापन अधिकारी तसेच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांची आहे. याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल नियम पुस्तिका खंड क्र. ४ मध्ये सविस्तर सूचना देणेत आल्या आहेत. तसेच या कार्यालयातील परिपत्रक क्र.एस.व्ही.सी.आर/गां.न.नं.-२/स-२।९५ दि. ५/५/१९९५ अन्वये देखील सूचना देणेत आल्या आहेत.

जमाबंदी आयुक्त कार्यालयातील अंतर्गत लेखा परिक्षण पथकाने राज्यातील काही कार्यालयातील गांव नमुना नं. २ ची तपासणी केली असता ब-याच ठिकाणी ते आद्यावत नसलेचे आढळून आले आहे. नगर भूमापन क्षेत्रातील गांव नमुना नं. २ अद्यावत नसलेने अकृषिक आकारणीची निश्चित रक्कम समजून येत नाही. त्याच प्रमाणे गांव नमुना नं. २ मधील अकृषिक आकारणीची मुदत संपलेल्या जमीनींची, पुढील मुदतीसाठी अकृषिक आकारणी करणेबाबत महसूल अधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविले जात नाहीत. यामुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात अडकून पडतो. ही बाब या कार्यालयाच्या अंतर्गत लेखा परिक्षणाचे वेळी तसेच महालेखापाल, नागपूर यांचेकडून करणेत येणारे लेखा परिक्षण यावेळी वारंवार उपस्थित करणेत आली आहे. तसेच या कारणासाठी मोठ्या प्रमाणात लेखा परिच्छेद उपस्थित झाले आहेत. गांव नमुना नं. २ आद्यावत राहावा या दृष्टीने खालील प्रमाणे सूचना देणेत येत आहेत.

१) नगर भूमापन हद्दीतील गांवठाणा बाहेरील सर्व्हे नंबर व त्यांना देणेत आलेले नगर भूमापन क्रमांक यांची जंत्री सर्व नगर भूमापन अधिकारी व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांनी तयार करावी.
२) परिरक्षण भूमापक यांनी त्यांचे सजामध्ये ज्या जमीनी अधिकृतपणे बिनशेतीकडे वर्ग झालेल्या आहेत त्यांचे आदेशाची नोंद गांव नमुना नं.२ मध्ये घेणेत आली आहे याची खात्री करावी. याकामी आवश्यकते नुसार गावकामगार तलाठी यांचेकडील गांव नमुना नं. २ ची पडताळणी करून माहिती घ्यावी.
३) अकृषिक आकारणीची मुदत संपलेल्या जमीनींबाबत पुढील कालावधीसाठी अकृषिक आकारणी करणेबाबत महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठवावे. यासाठी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचेकडील निर्णय क्र. एन.ए.ए. १०८७/३५७०/प्र.क्र. ५३/ल-५ दिनांक- २७/९/२००१ अन्वये कार्यवाही करावी. (प्रत संलग्न)
४) नगर भूमापन हद्दीतील सरकारी जमीनी भाडेपट्ट्याने अथवा इतर शर्तीवर प्रदान केलेबाबत आदेश प्राप्त झालेवर त्याची नोंद गांव नमुना नं. २ मध्ये घेणेत यावी.

जमाबंदी आयुक्त, व संचालक भूमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य पुणे.
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपविभागीय अधिकारी,
सर्व तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख,
संचालक, नगररचना ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, सहकार व निबंधक सहकारी संस्था पुणे.
विभागीय उपसंचालक व नगररचना आणि इतर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
महालेखापाल महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
सर्व मंत्रालयीन विभाग,
वित्त विभाग (व्यय-९) मंत्रालय, मुंबई-३२,
मा.मंत्री (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक,
प्रधान सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक,
महसूल व वन विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव व नियंत्रण अधिकारी,
महसूल व वन विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती ज-१ कार्यासन,